प्रेसनोट

वसई विरार शहर महानगरपालिका महापालिका “प्रभाग समिती आय”   कडून घरोघरी तिरंगा रॅलीचे आयोजन

आज वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती आय  तर्फे हरघर तिरंगा अभियानांतर्गत  दोन रॅलींचे  आयोजन करण्यात आले होते. एक  रॅली प्रभाग समिती आय कार्यालयातून झेंडा बाजार तहसील चिमाजी अप्पा स्मारकापर्यंत व तिथून पुन्हा त्याच मार्गे तहसील जी जे कॉलेज बस डेपो पार नाका ते प्रभाग समिती आय कार्यालय अशी पार पडली. सदर रॅलीमध्ये सहाय्यक आयुक्त श्रीमती अलका खैरे अग्निशमन विभागाचे बीट मार्शल प्रभाग समिती आय कार्यालयाचे अधीक्षक व कर्मचारी तसेच सर डी. एम. पेटीट रुग्णालयातील कर्मचारी व न्यू इंग्लिश स्कूल वसई या शाळेचे शिक्षक व विद्यार्थी हे हजर होते.

तर बाईक रॅली प्रभाग समिती आय कार्यालयातून झेंडा बाजार तहसील चिमाजी अप्पा स्मारकापर्यंत तिथून पुन्हा त्याच मार्गे तहसील जी जे कॉलेज बस डेपो पार नाका ते प्रभाग समिती आय कार्यालय अशी पार पडली.या बाईक रॅलीला मा.उपायुक्त अजित मुठे उपस्थित होते .